# वि.दि.दा.क्र. ०९/२०१६
# CNRNOMHOS120002412016
# शालीनी वि. अदिनाथ व इतर
# नि.क्र. ९१ खालील आदेश
# (आदेश दि.०४/०५/२०२४)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज तीला तीचा अतिरिक्त तोंडी पुरावा सादर करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे, वादीने यापुर्वीच ईलेकट्रॉनिक पुरावा म्हणजेच मोबाईलमधील मेमरी कार्ड दाखल केलेले आहे. तथापि, वादीचा तोंडी साक्ष पुरावा होताना सदर मेमरी कार्डला निशाणी देण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे मेमरी कार्ड बाबतीत वादीस अतिरिक्त तोंडी पुरावा देण्याचा आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादीने अर्जास हरकत घेतली आहे की, वादीचा पुर्वी पुरावा झालेला असून प्रतिवादीने वादीचा उलटतपास देखील घेतलेला आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दिनांक ०२.११.२०१९ रोजी निशाणी क्र. ५४ येथे तिचे सरतपास शपथपत्र दाखल केले होते. सदर तोंडी पुरावा शपथपत्र नि.क्र.५४ येथे वादीने सदर मेमरी कार्डबाबत कोणतेही साक्ष कथन केलेले दिसून येत नाही. वादीने दस्तऐवज यादी नि.क्र.६८/१ येथे सदरचे मेमरी कार्ड या कामात दाखल केले आहे. निश्चितच वादीचा स्वतःचा तोंडी पुरावा संपलेला असून वादीचा उलटतपास देखील पुर्ण झालेला आहे.

४. जरी वादीने पुर्वीच्या तोंडी पुराव्याच्या शपथपत्रामध्ये सदर मेमरीकार्ड बाबत कोणतेही कथन केले नसले व जरी वादीने दावा दाखल करतेवेळी सदरचे मेमरी कार्ड दाव्यासोबत दाखल केले नसले तरीही केवळ तेवढया

कारणासाठी वादीस जादा तोंडी पुरावा देण्याची परवानगी नाकारणे न्यायोचित ठरत नाही कारण प्रतिवादीला वादीच्या सदर जादा तोंडी पुरावा बाबतीत उलटतपास घेण्याची व सदर मेमरी कार्ड व त्यामधील असलेला मजकुर याची प्रासंगिकता व स्वीकार्यता अव्हानीत करायची संधी उपलब्ध राहणारच आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. ९१ मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत वादी यांनी सोसण्याचा आहे.

स्वा/-०४.०५.२०२४

दिनांक – ०४/०५/२०२४

(श्री. ए. पी. कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 04/05/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 04/05/2024 |
| Order uploaded on | --- | 04/05/2024 |